मुंमप्रविप्रा/सल्लागार नेमणूक/EFW-CR/०७-२२ दिनांक : २६/०७/२०२२

**कामाचे नाव :** "मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्त मार्ग ते मरिन ड्रॉईव्ह येथून सागरी किनारा मार्गापर्यंत वाहतुकीच्या दळणवळणासाठी मार्गाचे बांधकाम".

**विषय :** "मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्त मार्ग ते मरिन ड्रॉईव्ह येथून सागरी किनारा मार्गापर्यंत वाहतुकीच्या दळणवळणासाठी उन्नत/ भुयारी मार्गाचे बांधकाम" करण्याच्या कामासाठी शक्याशक्यता अहवाल तयार करण्यासाठी तसेच सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी आणि कंत्राटदाराच्या नेमणूकीसाठी विहित निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी सल्लागाराची नेमणूक करण्याबाबत — प्रशासकीय मान्यता

**१. प्रस्तावना:**

१.१ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे मुंबई बेट (शहर) भागातील वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी मूलभूत विकास योजना राबविण्यासाठी विविध प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

१.२ मुंबई शहर परिसरात भुयारी मेट्रो मार्ग -३, शिवडी ते वरळी उन्नत प्रकल्प, मुंबई पारबंदर प्रकल्प, सागरी किनारा मार्ग, नरिमन पॉईंट ते कुलाबा अशा विविध महत्त्वाच्या प्रकल्पांचे काम प्रगतीपथावर आहे.

१.३ सद्यस्थितीत दक्षिण मुंबई भागात ठिकठिकाणी वाहतूक संथगतीने होत असते. तसेच गर्दीच्या वेळी मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे.

**२. प्रकल्पाची आवश्यकता:**

२.१ प्राधिकरणामार्फत मुंबई शहराच्या पूर्व किनारपट्टीस समांतर असा मानखुर्द चेंबूर जोडरस्त्यापासून पी' डिमेलो रस्त्यावरील ऑरेंज गेट पर्यंत पूर्व मुक्त मार्ग बांधण्यात आला आहे. या मार्गामुळे दक्षिण मुंबईकडे वेगवान वाहतूक करणे शक्य झाले आहे.

२.२ पूर्व मुक्त मार्गावरील वाहतूक मुंबई पोर्ट ट्रस्टच्या ऑरेंज गेट येथे गजबजलेल्या पी' डिमेलो मार्गावर येऊन मिळते. त्यामुळे गर्दीच्या वेळी या ठिकाणी वाहनांच्या लांबवर रांगा लागतात

आणि मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. तसेच छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या पी' डिमेलो मार्गावरील मुख्य पोस्ट ऑफिसच्या चौकात वाहतूकीचे नियमन करणे अवघड होते.

२.३ मुंबई महापालिकेतर्फे मुंबईच्या पश्चिम किनारपट्टीस समांतर किनारा मार्गाच्या कामाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

२.४ तथापि, मुंबई शहरात पूर्व पश्चिम बाजूस जोडणारी प्रभावी वाहतूक निर्गमन व्यवस्था नसल्याने मुंबईकरांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो व पर्यायाने इंधन व वेळेची हानी होते.

## ३. प्रकल्पाची आखणी

३.१ मुंबई बेट शहरातील पूर्व मुक्त मार्ग ते मरिन ड्रॉईव्ह येथून सागरी किनारा मार्गापर्यंत वाहतुकीच्या दळणवळणासाठी उन्नत अथवा भुयारी मार्गाचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे. प्रकल्पाची लांबी सुमारे ३.५ किमी इतकी आहे. एकंदरीत भविष्यातील वाहतुकीचा व वाहनांच्या संख्येस अनुसरुन १+१ अथवा २+२ मार्गिका बांधण्याचे प्रस्तावित आहे.

३.२ प्रस्तावित मार्गरेषा पूर्व मुक्त मार्गापासून चिंचबंदर रेल्वे ओलांडणी पुलाच्या पूर्वेकडून सुरु होते व सरदार वल्लभभाई पटेल या रस्त्यावरुन हार्बर व मध्य रेल्वेमार्ग ओलांडून, मोहम्मद अली रस्ता ओलांडून, पट्टे बापूराव मार्ग (अलंकार सिनेमा चौक), राजा राजमोहन रॉय मार्ग, (हरकिसन नरोत्तमदास हॉस्पिटल). तसेच विठ्ठलभाई पटेल रस्ता, लॅमिंगूटन रोड, न्यू क्वीन रस्ता, पश्चिम रेल्वेवरील वरेकर रेल्वे पुल इ. रस्ते ओलांडून नेताजी सुभाषचंद्र बोस (मरिन ड्रॉईव्ह) येथे दक्षिण दिशेशी आणि पश्चिम दिशेला नेपियनसी रस्ता ओलांडून सागरी किनारा मार्गाशी जोडणे अशी प्रस्तावित आहे. हा प्रकल्प (CTS) Comprehensive Transport Study चा भाग नाही.

३.३ सदर प्रकल्पाची सर्वसाधारण मार्गरेषा दर्शविणारा समजुतीचा नकाशा जोडपत्र- १ येथे जोडलेला आहे.

## ४. सल्लागाराच्या कामाची रुपरेषा

४.१ सदर प्रकल्पाच्या मार्गरेषेच्या आखणीमध्ये उन्नत मार्ग व पर्याय म्हणून भुयारी मार्ग करण्याची शक्यता पडताळून पाहणे तसेच प्रकल्पाचा शक्याशक्यता अभ्यास (feasibility study) करून तांत्रिकदृष्टया सुसाध्य मार्गाची आखणी करणे प्रस्तावित आहे.

४.२ सल्लागाराने वाहतूक विनिमयासाठी यापूर्वी केलेल्या प्रकल्प अहवालांचा अभ्यास करून, विविध प्रकारच्या सेवावाहिन्यांची माहिती मिळवून, प्रस्तावित प्रकल्पामुळे बाधित होणा-या बांधकामांची व प्रकल्पग्रस्तांचे सर्वेक्षण करुन, प्रत्यक्ष प्रकल्पासाठी लागणा-या जमिनीचे हस्तांतरण करण्याबाबत आवश्यक ती प्रक्रिया राबवून, हेरिटेज इमारतीची माहिती घेऊन, संबंधित शासकीय, निम-शासकीय, महापालिका तसेच खाजगी आस्थापनांशी समन्वय साधून तांत्रिकदृष्टया सुयोग्य अशा पर्यायांची मार्गरिषा निश्चित करुन प्राधिकरणास अहवाल सादर करण्याच्या कामाचा अंर्तभाव करण्याचे प्रस्तावित आहे.

४.३ सल्लागाराच्या शक्याशक्यता अभ्यासाच्या (feasibility study) अनुषंगाने मार्गरिषेस सक्षम स्तरावर मान्यता घेऊन सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्याचे काम तदुनंतर हाती घेण्यात येईल.

४.४ सल्लागाराने बनविलेल्या सदरच्या सविस्तर प्रकल्प अहवालास व अंदाजपत्रकास सक्षम स्तरावर मान्यता घेऊन प्रकल्पाचे बांधकाम करण्यासाठी कंत्राटदाराच्या नियुक्तीकरीता विहित पध्दतीने निविदा प्रक्रिया राबविण्याचे प्रस्तावित आहे.

**५. कामाचे टप्पे व प्रस्तावित कालावधी :**

| अ. क्र. | कामाचे विवरण | कालावधी |
|---|---|---|
| १ | सल्लागार नियुक्तीसाठी निविदा प्रपत्रे तयार करणे. | २ आठवडे |
| २ | निविदा प्रसिध्दी व प्रक्रिया राबविणे. | ५ आठवडे |
| ३ | प्राप्त निविदांची छाननी व सक्षम स्तरावर मान्यता. | २ आठवडे |
| ४ | प्रकल्प शक्याशक्यता अहवाल बनविणे (feasibility study). | ६ आठवडे |
| ५ | सक्षम स्तरावर सादरीकरण व मार्गरिषेस मान्यता. | २ आठवडे |
| ६ | सविस्तर प्रकल्प अहवाल बनविणे व मान्यता. | ३ महिने |
| ७ | कंत्राटदाराच्या नियुक्तीसाठी निविदा प्रक्रिया राबविणे. | ६ आठवडे |

मुंबई शहर भागात पूर्व मुक्त मार्ग ते सागरी किनारा मार्ग याव्दारे पूर्व - पश्चिम किनारपट्टी जोडणारा व वेगवान सुविहित वाहतुक व्यवस्था उपलब्ध करुन देणारा अत्यंत महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. हा प्रकल्प तांत्रिकदृष्टया आव्हानात्मक आहे.

६. प्रस्ताव :

"मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्त मार्ग ते मरिन ड्राईव्ह येथून सागरी किनारा मार्गापर्यंत वाहतुकीच्या दळणवळणासाठी उन्नत/ भुयारी मार्गाचे बांधकाम" या प्रकल्पाची शक्याशक्यता तपासण्यासाठी (feasibility study) व सविस्तर प्रकल्प अहवाल बनविणे (DPR) व कंत्राटदाराच्या नेमणूकीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यासाठी निविदा मागविण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यासाठी विनंती करण्यात येत आहे.

मान्यतेसाठी सविनय सादर.

**श्री .एस.व्ही.आर.श्रीनिवास, (भाप्रसे)**
**महानगर आयुक्त**
**(मुं. म. प्र. वि. प्रा.)**

**माननीय मुख्यमंत्री तथा प्राधिकरण अध्यक्ष**